**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – नाथ वसंत मालोंडकर

माझे वय – ५० वर्षे,

व्यवसाय – व्यापार

रा./ने. – रामगड बाजारपेठ, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. टी.ए.भणगे यांचे मार्फत**

०१. दि. २८/११/२०२३ रोजी दुपारी १२.३० वा. मी माझ्या घरी होतो. माझ्या घरापासून साधारणपणे ३०० मीटर अंतरावरती अपघात झाला होता. मला एका अनोळखी मोटरसायकलस्वाराने अपघात झाला असल्याबाबत सांगितले. त्यानंतर मी माझी मोटरसायकल घेवून घटनास्थळी गेलो. त्या ठिकाणी मला देवूळवाडी येथे राहणारा रावजी सावळाराम घाडीगावकर हा रक्ताच्या थारोळयात पडलेला दिसला. त्याची मोटरसायकल क्र. एमएच-०७-३२५ एका बाजूला पडलेली दिसली. जमलेल्या लोकांनी ॲम्ब्यूलन्सला फोन लावला. ॲम्ब्युलन्स आल्यानंतर त्यास कणकवली येथील नागवेकर हॉस्पीटल येथे ॲडमिट केले. निलेश पराडकर हा सुध्दा आमच्याच गावातील राहणारा आहे. मला त्याच्या मोटरसायकलचा क्रमांक काय होता हे सांगता येणार नाही. मला जमलेल्या लोकांकडून समजले की, निलेश पराडकर याची मोटरसायकल व रावजी घाडीगावकर यांची मोटरसायकल यामध्ये धडक झाली होती. त्यानंतर दुसऱ्या गाडीने मी कणकवली येथे गेलो. संध्याकाळी ६.०० वा. पर्यंत मी कणकवली येथे होतो. संध्याकाळी ६.०० वा. डॉ. नागवेकर यांनी रावजी घाडीगावकर यांना मयत घोषित केले. मी घटनेबाबत पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. मला आता फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी२/पीडब्ल्यू३** दिली आहे. मला निलेश पराडकर दाखविल्यास मी त्याला ओळखू शकतो. ( नि.क्र. १२ वर आरोपीचा गैरहजेरीचा अर्ज )

सरतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.पई यांचे मार्फत.</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, निलेश पराडकर हा माझ्या गावातील राहणारा असल्यामुळे मी त्याला अपघाताच्या अगोदरपासून ओळखत होतो. हे म्हणणे खरे नाही की, अपघातस्थळी यापुर्वी बरेच अपघात झालेले आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अपघातस्थळापासून २०० मीटरच्या अंतरात बरेच अपघात झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अपघातानंतर मी स्वतः त्वरीत पोलीस स्टेशनला फिर्याद देण्याचा प्रयत्न केला नव्हता. मी फिर्याद ही रात्री ८.०० वा. कणकवली पोलीस स्टेशन येथे दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, वरील फिर्यादीशिवाय इतर कुठली फिर्याद नोंदविण्याचा प्रसंग आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दिल्यानंतर पोलीसांना भेटण्याचा परत कधी प्रसंग आला नव्हता. मला नागवेकर हॉस्पीटल येथे पोलीस भेटले होते. पोलीसांनी हॉस्पीटलमध्ये असताना माझा जबाब नोंदविण्याचा प्रयत्न केला नव्हता. अपघातग्रस्त व्यक्ती बेशुध्द होता त्यामुळे त्याच्याकडून पोलीसांनी अपघाताबाबत माहिती घेवून त्याचा जबाब नोंदविण्याचा प्रयत्न केला नव्हता. पोलीसांनी मयताच्या भावकीतील लोकांचा जबाब नोंदविण्याचा प्रयत्न केला होता. नागवेकर हॉस्पीटलमध्ये रावजी घाडीगावकर यांचे नातेवाईक हजर होते. नातेवाईकांनी घाबरुन फिर्याद दिली नव्हती.

०३. मी राजकारणामध्ये सक्रीय आहे. मी राष्ट्रवादी पक्षामध्ये कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माजी पंचायत समिती सदस्य होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना त्यांना आवश्यक असलेल्या फॉरमॅट प्रमाणे फिर्याद घेतली होती व त्यावर माझी फक्त सही घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी फॉरमॅटप्रमाणे फिर्याद तयार केली व त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात आल्यानंतर माझा जबाब वाचून साक्ष देण्याची तयारी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्याद वाचल्यामुळे मला अपघाताचा दिनांक, वेळ व मोटरसायकलचा क्रमांक सांगता आला, अन्यथा मला सांगता आला नसता.

०४. मी पोलीसांना फिर्याद देताना माझ्या घरापासून साधारणपणे ३०० मीटर अंतरावरती अपघात झाला होता, मला एका अनोळखी मोटरसायकलस्वाराने अपघात झाला

असल्याबाबत सांगितले, त्यानंतर मी माझी मोटरसायकल घेवून घटनास्थळी गेलो, त्या ठिकाणी मला देवूळवाडी येथे राहणारा रावजी सावळाराम घाडीगावकर हा रक्ताच्या थारोळयात पडलेला दिसला याबाबी फिर्याद देताना सांगितल्या होत्या. सदरच्या बाबी माझ्या फिर्यादीमध्ये का नमूद नाहीत याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना फिर्याद देताना जमलेल्या लोकांनी ॲम्ब्यूलन्सला फोन लावला, मला जमलेल्या लोकांकडून समजले की, निलेश पराडकर याची मोटरसायकल व रावजी घाडीगावकर यांची मोटरसायकल यामध्ये धडक झाली होती, त्यानंतर दुसऱ्या गाडीने मी कणकवली येथे गेलो, संध्याकाळी ६.०० वा. पर्यंत मी कणकवली येथे होतो या बाबी सांगितल्या नव्हत्या.

०५. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्यावेळी मी घरी होता, माझ्या घरापासून साधारणपणे ३०० मीटर अंतरावरती अपघात झाला होता, मला एका अनोळखी मोटरसायकलस्वाराने अपघात झाला असल्याबाबत सांगितले, त्यानंतर मी माझी मोटरसायकल घेवून घटनास्थळी गेलो, त्या ठिकाणी मला देवूळवाडी येथे राहणारा रावजी सावळाराम घाडीगावकर हा रक्ताच्या थारोळयात पडलेला दिसला, मला जमलेल्या लोकांकडून निलेश पराडकर व रावजी घाडीगावकर यांच्या मोटरसायकलीची धडक झाली होती असे समजले होते, त्यानंतर मी कणकवली येथे नागवेकर हॉस्पीटल येथे गेलो होतो, त्यानंतर फिर्याद दिली होती हे सर्व खोटे सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मयताचे नातेवाईक हे फिर्याद देण्यासाठी तयार नव्हते त्यामुळे मी पोलीसांच्या सांगण्यावरुन फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी लोकांच्या ऐकीव माहितीवर विसंबून फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद देवून खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १०/१२/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण.